उद्योग क्षेत्रात बुलढाणा जिल्हा अग्रेसर राहणार >> पान 2

एआय तंत्रज्ञानाव्दारे वारीत होणार गर्दीचे व्यवस्थापन >> पान 3

पालकमंत्र्यांनी घेतला पाणीटंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा आढावा >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

नेहमी खरे राहा, कारण सत्य हेच आपल्याला मुक्त करते.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 236 ■ बुधवार, दि. 09 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



"हो, साइज मॅटर करते", पुरुषांच्या प्रायव्हेट पार्टबद्दल करीनाचा बोल्ड खुलासा, बॉलिवूडमध्ये चर्चांना उधाण

आतील पान

# राज्यात घरकुलांसाठी ५ ब्रास वाळू मोफत



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : राज्यात एम सँड म्हणजे कृत्रिम वाळूबाबत धोरण आणण्यात येणार असून त्यावर पुढच्या कॅबिनेटमध्ये चर्चा केली जाणार आहे अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यापुढे राज्यातील मोठ्या प्रकल्पातील वाळू उपसा करण्यात येणार आहे आणि त्या प्रकल्पांची क्षमता वाढवण्यात येणार असल्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.**

## ■ राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय
## ■ पुढच्या कॅबिनेटमध्ये एम सँड अर्थात कृत्रिम वाळू धोरणावर चर्चा

वाळूबाबत सध्या अस्तित्वात असलेली जुनी डेपो पद्धती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या ठिकाणची वाळू संपल्यानंतर तो डेपो बंद करण्यात येईल. यापुढे आता नदी विभागासाठी दोन वर्षांसाठी आणि खाडी पात्रासाठी तीन वर्षांसाठी लिलाव पद्धतीने वाळू उपसा दिला जाणार आहे.

घरकुलांसाठी पाच ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. जनतेची जेवढी मागणी आहे तेवढी वाळू उपलब्ध करण्यात येणार आहे.

जलसिंचनाच्या मोठे प्रकल्पामध्ये असलेली वाळू उपसा करण्यात येईल आणि धरणांची क्षमता वाढवली जाणार आहे. परराज्यातून येणाऱ्या



वाळूवर सध्या झीरो रॉयल्टी दिली जाते. त्यावरही चर्चा झाली आहे.

राज्यात एम सँड धोरण

राज्यात यापुढे एम सँड धोरण आखण्यात येणार आहे. पुढच्या मंत्रिमंडळामध्ये त्यावर चर्चा करण्यात येणार आहे.

त्यानुसार येत्या तीन वर्षांमध्ये राज्यातील सर्व सरकारी, सार्वजनिक बांधकामं असतील त्या ठिकाणी कृत्रिम वाळू वापरण्यात येणार आहे. यापुढे सरकारी बांधकामासाठी नदी पात्रातील वाळू वापरण्यात येणार नाही. कृत्रिम वाळू निर्मितीसाठी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये ५० एम सँड क्रशर निर्मित करण्यात येणार आहे.

मंत्रिमंडळाचे इतर निर्णय

१) नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार (नगर विकास).

२) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर (महसूल).

३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार (गृहनिर्माण).

४) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा >> पान २

## बोगस प्रमाणपत्रातील हजारो लोकांचे बॅकग्राउंड बांगलादेशचे; सोमय्यांचा खळबळजनक दावा



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** भाजपचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी आज जळगाव पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट देऊन शहरातील बोगस जन्म प्रमाणपत्र प्रकरणाची माहिती जाणून घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी या गंभीर प्रकरणावर सविस्तर भाष्य केले. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात अपात्र लोकांनी बेकायदेशीर आणि बनावट कागदपत्रे सादर करून जन्म प्रमाणपत्रे मिळवल्याचे उघड झाले असून त्यांचे बॅकग्राऊंड हा बांगलादेशाचे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## कोल्हापूरच्या ग्रामीण भागातही पावसाने हजेरी

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राज्यभरात सर्वच जिल्ह्यात सूर्य आग ओकत आहे. उन्हाचा तडाखा रोज वाढून तापमान ४० डिग्री सेल्सिअसहून अधिक राहू लागलंय. त्यातच कोल्हापूर शहरात उन्हाने शरीराच्या लाहीलाहीनंतर मेघगर्जनेसह आलेल्या अवकाळी पावसाने नागरिकांना दिलासा दिलाय. शहर परिसरात मंगळवारी दुपारी ढगाळ वातावरण राहिल्यानंतर संध्याकाळी काही मिनिटे मेघगर्जनेसह पावसाचा शिडकावा झाला. तसेच कोल्हापूरच्या ग्रामीण भागातही पावसाने हजेरी लावलीय. यामध्ये कोल्हापूरच्या आजरा तालुक्यात तर गारपिटीसह मुसळधार पावसाने तडाखा दिलाय.

## आम्ही सहाही राज्यमंत्री नाराज नाहीत - पंकज भोयर



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** राज्यामध्ये राज्यमंत्र्यांना अधिकार न दिल्याने ते नाराज असल्याच्या वावड्या उठल्या आहेत. प्रत्यक्षात आम्ही सहाही राज्यमंत्री नाराज नाहीत. आम्हाला मुख्यमंत्री व कॅबिनेट मंत्र्यांनी संविधानिक अधिकार दिलेले आहेत. आम्हाला चांगल्या प्रकारच्या सुविधा आहेत, आम्हाला काम करण्याला स्पेस आहे. घटनेमध्ये जे अधिकार जालना जिल्हाला दिलेले आहेत ते अधिकार सर्वांना मिळाले आहेत. पण आम्ही सहाही राज्यमंत्री नाराज नाहीत खुश आहोत.

## खासदार संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग पुस्तकाचे लवकरच प्रकाशन होणार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पत्राचाळ प्रकरणांमध्ये संजय राऊत यांना कारावास भोगावलागला त्यांच्या याच कारावाचा दरम्यान आलेले अनुभव संजय राऊत यांनी पुस्तक रूपात मांडलेले आहेत लवकरच या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे संजय राऊत आणि या पुस्तकाला नरकातला स्वर्ग असे नाव दिले आहे. या पुस्तकातून संजय राऊत नेमके काय गोप्या स्पोर्ट करतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

## पोलीस कर्मचाऱ्याच्या गाडीचा भीषण अपघात; कुटुंबातील दोन चिमुकल्यांसह चौघे ठार, वर्धातील दुर्दैवी घटना

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्ध्याच्या समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव येथून अपघाताची एक मोठी बातमी समोर आली आहे. यात आपल्या कुटुंबासह वर्ध्याकडे कारने येत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या गाडीचा भीषण अपघात झाला आहे. रस्त्यावर रान डुक्कर आडवे आल्याने तरोडा गावाजवळ कार अनियंत्रित झालीय. त्यामुळे समोरून येणाऱ्या डिझेल टँकरला या गाडीची टक्कर झाली आहे. यात पोलीस कर्मचारी प्रशांत वैद्य यांच्या पत्नी प्रियंका >> पान २



## मराठवाड्यात पाणीटंचाईला सुरुवात; विभागात ४२.९०% जलसाठा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यात तापमानाचा उच्चांक प्रचंड वाढला आहे. बहुतांश ठिकाणी तापमान ४३-४५ अंश सेल्सियस पर्यंत जात आहे. उष्णतेच्या चटक्यासह आता राज्याला पाणीटंचाईची चाहुलही लागली आहे. राज्यातील लघू, मध्यम आणि मोठ्या धरणांमध्ये आता अर्ध्याहूनही कमी पाणीसाठा शिल्लक आहे. यात यंदा पुण्याच्या धरणांमध्ये सर्वात कमी पाणीसाठा असून ३९.५५ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. हा साठा मराठवाड्याच्या उपयुक्त पाणीसाठ्याहूनही कमी असल्याने चिंता व्यक्त केली जातेय. दरम्यान, मराठवाड्यात आता ४२.९० टक्के जलसाठा शिल्लक आहे. दरम्यान, धरणातील पाण्याचं झपाट्यानं बाष्पीभवन होत असून अनेक धरणांचा पाणीसाठा एप्रिल मध्यापर्यंत मायनसमध्ये जाईल असं सांगण्यात येत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत पाणीसाठा चांगला असला तरी शेतकऱ्यांच्या पिकांसाठी सोडण्यात >> पान २

## शेतकऱ्यांसाठी खुशखबर!

## जमिनीचे वाद कमी होणार, सलोखा योजनेला मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतजमिनीच्या ताब्याबाबत निर्माण होणाऱ्या वादांचे निराकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'सलोखा' योजनेला आता १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे,अशी माहिती म हसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्यात शेतजमिनीच्या मालकी, ताबा, मोजणी, बांध, रस्ते आदी विषयांवरून असंख्य वाद निर्माण झाले असून, अनेक प्रकरणे न्यायालयात वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या वादांम ुळे कौटुंबिक नाती ढासळली असून, पिढ्यानपिढ्या वेळ आणि पैशाचे नुकसान होत आहे.

या पार्श्वभूमीवर, एका शेतकऱ्याच्या नावावरील जमीन दुसऱ्याच्या ताब्यात आणि दुसऱ्याच्या नावावरील जमीन पहिल्याच्या ताब्यात असल्यास, अशा बदलांच्या अधिकृत नोंदणीसाठी शासनाने 'सलोखा योजना' सुरू केली आहे.



या योजनेत फक्त १ हजार रुपये मुद्रांक शुल्क आणि १ हजार रुपये नोंदणी शुल्क आकारून दस्त नोंदणी करता येते. ही योजना १ जानेवारी २०२३ पासून लागू करण्यात आली होती, आणि तिची मुदत २ जानेवारी २०२५ रोजी संपली होती.

मात्र, या योजनेला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याम ुळे, सरकारने तिची मुदत आता १ जानेवारी २०२७ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, न्यायालयीन प्रक्रिया व खर्च टाळता येणार आहे.

# विधेयके अडवून ठेवणे बेकायदेशीर

## सर्वोच्च न्यायालयाचा तमिळनाडूच्या राज्यपालांना दणका; १० विधेयके मंजूर

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने आज एक ऐतिहासिक असा निर्णय दिला. तमिळनाडूचे राज्यपाल आरएन रवी यांनी तमिळनाडू राज्य सरकारने मंजूर केलेली १० विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ अडवून ठेवली होती. राज्यपालांची ही कृती बेकायदेशीर आणि कायद्याचे चुकीचे उदाहरण असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच राष्ट्रपतींनी या विधेयकांवर केलेली कोणतीही कारवाईही दखलपात्र नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच राज्यपालांकडे दुसऱ्यांदा विधेयके सादर केल्याच्या तारखेपासून सदर विधेयके मंजूर झाल्याचे मानले जाईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे. बी. पारडीवाला आणि आल. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, विधानसभेने पुनर्विचार करून विधेयक राज्यपालांकडे पाठविल्यानंतर त्याला राज्यपालांनी मंजूरी देणे आवश्यक आहे. राज्यपालांसमोर दुसऱ्यांदा विधेयक सादर केल्यानंतर त्याला मंजूरी द्यावी लागेल. जर पहिल्या विधेयकापेक्षा दुसरे विधेयक वेगळे असेल तरच अपवाद म्हणून त्याकडे पाहता येईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

तमिळनाडू सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर संविधानाच्या अनुच्छेद २०० शी निगडित असलेला हा महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपालांनी अडवून ठेवल्याचा आरोप सरकारने याचिकेद्वारे केला होता.

राज्यपाल आर. एन. रवी यांनी १० विधयेकांना अडवून ठेवल्याचा आरोप तमिळनाडू सरकारने केला होता. यातील सर्वात जुने विधेयक जानेवारी २०२० चे आहे. यातील अनेक विधेयकांना विधानसभेने पुन्हा मंजूरी देऊन राज्यपालांकडे पाठविले होते. दुसऱ्यांदा विधेयक राज्यपालांकडे पाठविल्यानंतर त्याला मान्यता द्यावीच लागते. मात्र तरीही राज्यपालांनी दीर्घकाळ या विधेयकांवर निर्णय घेतला नाही. त्यानंतर सदर विधेयके राष्ट्रपतीकडे पाठविणार असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

''आम्ही राज्य सरकारच्या अधिकाराला कमकुवत केले जाईल, अशा प्रकारच्या निर्णयाला समर्थन देणार नाही. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या परंपरांचा आदर राखून त्याप्रमाणे वागले पाहिजे. जनतेने निवडून दिलेल्या सरकारचा आदर राखायला हवा. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञ या नात्याने संविधानाद्वारे घेतलेल्या शपथेद्वारे आपली भूमिका पार पाडली पाहिजे, न की आपल्या राजकीय अनुभवाद्वारे वागले पाहिजे'', असे मत व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने राज्यपालांच्या कृतीवर ताशेरे ओढले.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे १० विधेयके मंजूर**

तमिळनाडू सरकारचे वकील रागेश द्विवेदी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राज्यपालांच्या असंवैधानिक कृतीला तर फटका बसलाच आहे. त्याशिवाय ज्या तारखेला विधेयका राज्यपालांकडे दुसऱ्यांदा सादर केली होती, त्या तारखेपासून सदर विधेयक संमत झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद १४२ नुसार आपले अधिकार वापरून दहा विधेयक मंजूर केली आहेत. आता या विधेयकांना राज्यपालांकडे पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. या विधेयकांचे रुपांतर आता कायद्यात होईल.

# उद्योग क्षेत्रात बुलढाणा जिल्हा अग्रेसर राहणार

## पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांचा विश्वास



दैनिक आपला विदर्भ

- जिल्हा गुंतवणूक परिषदेत ८६ सामंजस्य करार
- ६३१.६७ कोटींची गुंतवणूक
- २,९२४ नवीन रोजगार निर्मिती



**बुलढाणा/प्रतिनिधी : बुलढाणा जिल्हा हा कृषी प्रधान आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा असून या जिल्ह्यात औद्योगिक विकासाची प्रचंड क्षमता आहे. भविष्यात हा जिल्हा उद्योग क्षेत्रात अग्रेसर राहिल असा विश्वास पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी जिल्हा गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केला.**

शहरातील बुलढाणा अर्बन रेसीडेंसी क्लब येथे आयोजित जिल्हा गुंतवणूक परिषदेला केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव, आमदार डॉ.संजय कुटे, आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उद्योग उपसंचालक श्रीमती रंजना पोळ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनिल पाटील, ऍड. नाझेर काझी, जिल्ह्यातील उद्योजक, निर्यातदार, व्यापारी उपस्थित होते.

पालकमंत्री ना. पाटील पुढे म्हणाले, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्हा राज्यात चौथा तर अमरावती विभागात पहिला आला असून याचा अभिमान आहे. राज्यात अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांनी १००%हून अधिक साध्य करून अमरावती विभाग राज्यात प्रथम आला आहे. जिल्हावासियांमध्ये कष्टाची आणि नाविन्यता घडविण्याची ताकद आहे. उद्योगवाढीसाठी पायाभूत सुविधा, दळणवळण, पाण्याची सुविधा असली पाहिजेत. त्यासोबत जागेची उपलब्धता देखील असली पाहिजेत. त्यासाठी सध्या जिल्ह्यात ६७३ हेक्टर औद्योगिक क्षेत्र आहे. हे क्षेत्र वाढविण्यावर लोकप्रतिनिधींसह शासनाचा भर आहे. समृद्धी महामार्ग, सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्ह्याचा औद्योगिक विकास साधण्यास मदत होणार आहे. सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून उद्योगासाठी पाणी आरक्षित करता येणार आहे. मुख्यमंत्री, उद्योगमंत्री सकारात्मक असून त्यांच्या माध्यमातून जिल्ह्याचा औद्योगिक विकास साधला जाईल. या जिल्हा गुंतवणूक परिषदेत ८६ सामंजस्य करार झाले असून, ६३१.६७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून यातून २,९२४ नवीन रोजगार उपलब्ध होणार आहेत. यावर्षी जिल्ह्यातील निर्यात १५०० कोटीपर्यंत जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी उद्योजक, व्यापारी, निर्यातदारांना राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल,असे पालकमंत्री ना. पाटील यांनी आश्वस्त केले.

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, जिल्ह्यात प्रबळ औद्योगिक क्षमता आहे. उद्योग, रोजगार वाढविण्यासाठी कापूस, सोयाबिनसह कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग उभे राहावे. समृद्धी महामार्ग, रेल्वे जिल्ह्यात दळणवळण सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. प्रशासनाने औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमण काढून जागा उपलब्ध करावी. त्याठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. औद्योगिक प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा. उद्योगांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. त्यासाठी जिल्हावासियांच्या उद्योगाबाबतीत नवनवीन संकल्पना पूर्ण राबवाव्यात. त्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन सहकार्य करेल, असेही केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार डॉ. संजय कुटे, आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी जिल्ह्यात उद्योगवाढ, रोजगार निर्मिती, गुंतवणुकीत वाढ आणि औद्योगिक क्षेत्र वाढविण्यावर लक्ष्य केंद्रीत केले असल्याचे सांगितले.

या जिल्हा गुंतवणूक परिषदेत या वर्षी २०२५-२६ मध्ये, वस्त्रोद्योग, कृषी, अन्न प्रक्रिया, अभियांत्रिकी, बायोटेक, केमिकल आणि इतर क्षेत्रातील उद्योगांचे ८६ सामंजस्य करार झाले असून, ६३१.६७ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि २,९२४ नवीन रोजगार उपलब्ध होणार आहेत. सामंजस्य करारांमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्रात १२१.३९ कोटी गुंतवणुकीचे २० सामंजस्य करार, कृषी प्रक्रिया क्षेत्रात ५८.८० कोटींचे १३, अन्न प्रक्रिया क्षेत्रात ४६.७९ कोटींचे १४, अभियांत्रिकी क्षेत्रात ३४.१० कोटींचे ९, बायोटेक क्षेत्रात ७०.५४ कोटींचे ३, रसायन क्षेत्रात १६१.५५ कोटींचे २४ असे एकूण ६३१.६७ कोटी रुपये गुंतवणुकीचे ८६ सामंजस्य करार करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाव्यवस्थापक प्रमोद लांडे तर आभार प्रदर्शन व्यवस्थापक सुनिल पाटील यांनी केले.

## जागतिक कोकणी भाषा दिन

आज ९ एप्रिल आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो.

## ५ वर्षापूर्वी रेप करून गळा चिरला, आता तिसरीसाठी पत्नीचा केला खून, कारण चक्रावून टाकणारं

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यात कोरची तालुक्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका ३२ वर्षीय युवकाने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. आरोपीनं पत्नीचा राहत्या घरात गळा आवळून खून केला. यानंतर त्याने हा अपघात असल्याचा भासवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा बनाव फार काळ टिकला नाही. पोलिसांनी कसून चौकशी केली असता आरोपीनं हत्येची कबुली दिली आहे. प्रदीप हरामी असं आरोपी पतीचं नाव आहे.

धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांनी आणखी खोलात जाऊन तपास केला असता, आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. आरोपीनं यापूर्वी २०१८ मध्ये आपल्या प्रेयसीची गळा चिरून हत्या केली होती. या प्रकरणी त्याला तीन वर्षाची शिक्षा देखील झाली होती. अलीकडेच त्याला २०२४ मध्ये जामीन मिळाला. जामिनावर बाहेर आल्यानंतर आरोपीच्या कुटुंबीयांनी त्याचा विवाह छत्तीसगड येथील रहिवासी असलेल्या २१ वर्षीय चमेलीशी लावून दिला होता. पण लग्न होऊनही त्याचे अन्य एका महिलेसोबत अनैतिक संबंध सुरू होते. याबाबतचे काही फोटोज आणि व्हिडीओज आरोपीच्या फोनमध्ये होते. शिवाय तो सातत्याने त्या महिलेशी व्हिडीओ कॉलवरून संवाद साधत होता. ही बाब पत्नीच्या लक्षात आल्यानंतर तिने आरोपीला जाब विचारायला सुरुवात केली. फोनमधील फोटो कुणाचे आहेत? तिच्याशी काय संबंध आहेत? असे सवाल पत्नीने विचारले.

पत्नीने वारंवार प्रश्न विचारल्याने संतापलेल्या आरोपीनं तिचा घरातच गळा आवळून खून केला. १ एप्रिलला आरोपीनं पत्नीचा खून केल्यानंतर, पत्नी पाय घसरून पडली आणि तिचं डोकं सोफ्याला धडकलं, यातच तिचा मृत्यू झाला, असा बनाव रचला. मात्र त्याचा हा बनाव फार काळ टिकला नाही. ५ एप्रिलला जेव्हा शवविच्छेदन अहवाल आला, तेव्हा त्यात चमेलीचा मृत्यू गळा दाबल्याने झाल्याचं समोर आलं. या रिपोर्टनंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत त्याची कसून चौकशी केली. यावेळी त्याने पत्नीच्या हत्येची कबुली दिली. प्रदीप हरामी असं नराधम आरोपीचं नाव आहे. पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

पान १ वरून...

## राज्यात घरकुलांसाठी

अभिन्यासातील इमारतींचा उॐ मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय (गृहनिर्माण).

५) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-२०२५ (महसूल).

६) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन).

७) खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णय (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये).

८) शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी / योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्र्चित (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये).

९) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा (ग्रामविकास).

## पोलीस कर्मचाऱ्याच्या गाडीचा

आणि त्यांच्या मुलाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर प्रशांत वैद्य व मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची मोठी घटना घडली आहे. दुर्दैवाने यात तीन वर्षाचा मुलगा तर पाच वर्षाच्या मुलीचाही मृतकांमध्ये समावेश आहे. काल (७ एप्रिल) मध्यरात्रीच्या सुमारास हा भीषण अपघात झाला आहे.

**रिलायन्स मार्टमधून एक्सपायरी आईस्क्रीमची विक्री**

आईस्क्रीम खाणाऱ्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एक्सपायरी झालेली आईस्क्रीम विकल्या जात असल्याची धक्कादायक बाब भंडाऱ्याच्या तुमसरच्या रिलायन्स स्मार्ट मॉलमध्ये समोर आलीय. यात एक्सपायरी झालेली आईस्क्रीम ही दिनशॉज कंपनीची आहे. तुमसर शहरातील अभिषेक भुरे हा युवक रात्री रिलायन्स स्मार्ट मॉलमध्ये आईस्क्रीम घ्यायला गेला. त्यांनी दिनशॉज कंपनीची एकावर एक फ्री असलेली संत्रा बर्फी फ्लेवरची आईस्क्रीम घेतली असता त्या आईस्क्रीम बॉक्सवर एकावर एक असे स्टिकर चिपकविलेले दिसून आलेत. वरचा स्टिकर काढला असता, खालील स्टिकरवर आईस्क्रीम उत्पादनाची मॅनीफॅक्चरिंग तारीख दिसून आली. त्यावरून ही आईस्क्रीम एक्सपायरी झाल्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. उन्हाळ्याची दाहकता सुरू झाली असून अनेक जण आता आईस्क्रीम खाण्यावर जोर देतात. मात्र, आइस्क्रीम खाणाऱ्यांनी आता सावधगिरी बाळगणे गरजेचं आहे. दरम्यान, मॉलचे व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी यावर बोलण्यास नकार दिलाय.

**ऑटो डीलर व्यापारी रमन चांडक यांची हत्या**

अकोट येथील चारचाकी वाहनांचे ऑटो डीलर असलेल्या व्यापारी रमन चांडक यांची हत्या करण्यात आली आहे. अकोट तालूक्यातील अकोला जहांगीरजवळ ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यात चाकू भोसकून आणि दगडाने मारून ही हत्या करण्यात आली आहे. व्यवसायातील मतभेदातून ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणत अकोट ग्रामीण पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतल्याचे ही पुढे आले आहे. सध्या पोलीस पुढील तपास करत आहे.

## मराठवाड्यात पाणीटंचाईला

येणारी आवर्तने, पिण्याचे पाणी, औष्णीक वीज केंद्रे आणि औद्योगिक कारणांसाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या तुलनेत सध्या राज्यातील धरणांची स्थिती काय आहे?

राज्याचा सरासरी पाणीसाठा किती?

राज्याच्या एकूण सहा महसूल विभागांचा म्हणजेच नागपूर, अमरावती, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकणातील एकूण धरणांमध्ये आज (८ एप्रिल) ४३.६७ टक्के सरासरी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. राज्यातील सर्व धरणांमध्ये मिळून २५ हजार ३९७ दलघमी पाणीसाठा उरलाय. विभागनिहाय कुठे किती?

पुणे विभाग: ३९.५५%
मराठवाडा: ४२.९०%
नाशिक: ४५.७३%
कोकण: ५१.१३%
नागपूर: ४३.५२%
अमरावती: ५१.४३%

मराठवाड्यातील धरणांमध्ये सध्या ४२.९०% पाणीसाठा शिल्लक आहे. पैठणच्या जायकवाडी धरणात आज उपलब्ध पाणीसाठा ४९.८६% आला असून एप्रिलच्या सुरुवातीलाच पाणीसाठा ५० टक्क्यांच्या खाली आल्याने मराठवाड्यात चिंता व्यक्त करण्यात येत आहे.बीडचे माजलगाव धरण ३८.१३ टक्के तर मांजरा ४२.३७% जलसाठा शिल्लक राहिला आहे. हिंगोलीच्या सिद्धेश्र्वर ६१.१०% आणि येलदरी धरणात ५९.३५% पाणी शिल्लक असून नांदेड विष्णूपुरी धरणात ३९.८७% पाणी आहे. धाराशिवला उजनीतून पाणीपुरवठा होतो. सध्या उजनीत १९.३१% पाणीसाठा शिल्लक आहे. उनजीचा पाणीसाठा एप्रील मध्यापर्यंत मायनसमध्ये जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. भीमा नदीत उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्याने सोलापूर शहरासह नदी काठच्या गावांमधील पाण्याचा प्रश्र्न सध्या तरी मिटणार आहे. मराठवाड्यात पाणीटंचाई म्हणजे नाशिक नगरच्या धरणातून पाण्याची आवर्तनं होण्याची शक्यता असते. त्यामुळे नाशिक आणि नगरच्या धरणसाठ्यात किती पाणीसाठा शिल्लक आहे? नाशिकच्या एकूण धरणांमध्ये सध्या ४५.७३% पाणीसाठा शिल्लक आहे. दारणामध्ये सध्या ४४.५६% पाणी शिल्लक असून गंगापूर ६१.५६%, गिरणा ३१.१५%, तर अहिल्यानगरचे भंडारदरा ६५.५७%, मुळा ४८.९९, निळवंडे ३८.१९% पाणी शिल्लक आहे.

## "हो, साइज मॅटर करते", पुरुषांच्या प्रायव्हेट पार्टबद्दल करीनाचा बोल्ड खुलासा, बॉलिवूडमध्ये चर्चांना उधाण

**मुंबई/प्रतिनिधी :**जेव्हा कधी बॉलिवूडमधील कोणती अभिनेत्री थेट आणि उघडपणे बोलते, असा विषय निघतो, तेव्हा करीना कपूर हे नाव हमखास पुढे येतं. अनेकदा तिने आपल्या मनातलं अगदी स्पष्टपणे आणि बेधडकपणे सांगितलं आहे. यामुळे ती चर्चेतही राहिली आणि काही वेळा वादातही अडकली. एकदा तर करण जोहर च्या लोकप्रिय शोमध्ये ती पुरुषांच्या खासगी अवयवांबद्दलही बोलली, ज्यामुळे प्रेक्षक आणि चाहत्यांमध्ये प्रचंड आश्चर्य व्यक्त करण्यात आलं.

'कॉफी विथ करण'मध्ये करीनाचे बोल्ड उत्तर-

'कॉफी विथ करण' या बॉलिवूडच्या सर्वात वादग्रस्त टॉक शोपैकी एक मानल्या जाणाऱ्या कार्यक्रमात करीना एका एपिसोडमध्ये अभिनेता इमरान खान सोबत सहभागी झाली होती. शोमधील रॅपिड फायर राऊंडमध्ये करणने करीनाला थोडेसे संवेदनशील आणि खळबळजनक प्रश्न विचारले. सुरुवातीला करीनाने काही प्रश्नांना उत्तर देण्यास नकार दिला, पण करणच्या आग्रहामुळे ती अखेर तयार झाली.

साइजवर प्रश्न, करीनाचं थेट उत्तर-

करणने थेट विचारलं, "  ?" यावर करीना काही क्षण गप्प राहिली. इमराननेही उत्सुकतेने मध्ये येऊन म्हटलं, "सर्व पुरुषांच्या वतीने, कृपया उत्तर द्या." काही वेळ विचार करून करीना हसत उत्तर देते, "माझ्यासाठी साइज मॅटर करतो." तिच्या या उत्तराने स्टुडिओतील वातावरण क्षणातच बदललं आणि सोशल मीडियावरही ही क्लिप प्रचंड चर्चेत आली.

करीनाला वादांची सवय नाही-

करिनाच्या या उत्तराने तिच्यावर टीकाही झाली, पण तिला फारसा फरक पडला नाही. तिने नेहमीच आपल्या बोलण्याच्या पद्धतीवर विश्वास ठेवला आहे. तिच्या मते, सत्य बोलणं हेच महत्त्वाचं आहे आणि ती कोणाच्याही अपेक्षांमध्ये अडकत नाही. 'कॉफी विथ करण' शो अनेक चर्चित सेलिब्रिटींना त्यांच्या बेधडक उत्तरांमुळे प्रकाशझोतात आणतो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### हॉर्न वाजवल्याच्या वादातून दोन गटात हाणामारी; बाप-लेक गंभीर जखमी, घटना सीसीटीव्हीत कैद



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडीत वंजारपट्टी नाका परिसरातील सिटी टॉवर हाऊसिंग सोसायटीत किरकोळ कारणावरून मोठा वाद उफाळून आला. बाईकचा हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून दोन गटांत हाणामारी झाली. या घटनेत तनवीर फारुकी आणि त्यांचा मुलगा अदीन फारुकी हे बाप-लेक गंभीर जखमी झाले आहेत. ही संपूर्ण घटना सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. शहबाज अन्सारी (पहिला मजला) आणि तनवीर फारुकी (दुसरा मजला) या शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबांमध्ये आधी मुलांच्या वादातून सुरुवात झाली. मात्र, वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. शहबाज अन्सारी, त्यांचा मुलगा आणि अन्य साथीदारांनी मिळून तनवीर फारुकी व अदीन फारुकी यांच्यावर जबर हल्ला केला. दोघांनाही गंभीर दुखापत झाल्याने प्रथम भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ठाणे सिव्हिल रुग्णालयात हलवण्यात आले आहे. निजामपूर पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

### सुप्रिया सुळे यांचा दौरा हा पूर्वनियोजित -पृथ्वीराज जाचक



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज महाराष्ट्र राज्य साखर परिषदेचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांच्या निवासस्थानी भेट घेतली आहे. सध्या छत्रपती सहकारी कारखान्याची निवडणूक लागल्याने सुप्रिया सुळे यांच्या भेट ही महत्वपूर्ण मानली जाते. पृथ्वीराज जाचक यांना आमचा बिनशर्त पाठिंबा आहे अशी भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली. सुप्रिया सुळे यांनी पाठिंबा दिल्याने कारखान्याची निवडणूक बिनविरोध होईल असं मत पृथ्वीराज जाचक यांनी व्यक्त केलंय.

### सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात कोर्टामार्फत नेमण्याची मागणी - प्रकाश आंबेडकर

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आज कोठडीत मृत्यू प्रकरणात न्यायालयीन चौकशी करावी अशी आम्ही मागणी केली. मात्र, या



नंतर कारवाई कोण करणार याबाबत कायदा अपुरा आहे. त्यामुळे सोमनाथ सूर्यवंशी यांचा कोठडीत मृत्यू झाला आहे. मात्र, कायदा अपुरा असल्याने तपासाबाबत कोर्टाने निर्देश द्यावेत अशी आम्ही मागणी केली आहे. कोर्टाने हे मान्य केले पुढील सुनावणी २९ एप्रिल ला होईल. शासनाला नोटीस काढली आहे. या प्रकरणात एसआयटी नेमावी आणि ही एसआयटी सरकारच्या नाही तर कोर्टाच्या देखरेखीखाली काम करेल अशी आम्ही मागणी केली आहे.

### सिंधुदुर्ग आरटीओची खासगी बसवर कारवाई, २० गाड्यांवर २ लाखांची दंडात्मक कारवाई

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विभागाच्या पथकाने गेल्या दोन दिवसांत जिल्ह्यातील इन्सुली व ओसरगाव या दोन चेकनाक्यांवर ९५ खासगी बसची तपासणी केली. यात २० गाड्यांवर दंडात्मक कारवाई करून २ लाख १० हजार रुपयांचा दंड वसूल केला. आरटीओच्या या धडक कारवाईमुळे खासगी बसचालक-मालकांमध्ये खळबळ उडाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून खासगी बसच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. या बसेसमधून मोटारसायकल, खासगी सामान यासह सध्या हंगाम सुरू असल्यामुळे आंब्याच्या पेट्यांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

# एआय तंत्रज्ञानाव्दारे वारीत होणार गर्दीचे व्यवस्थापन



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी : वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र, भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी आज पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.**

वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी आज पंढरपूर येथील बसस्थान येथून घेण्यात आली यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय. पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते. आता प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल



कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे.

या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेहऱ्याची ओळखी द्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती , ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल. गर्दीची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली. वारी कालावधीतील गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या एक वर्षापासून प्रशासनातील अधिकारी एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत संशोधन करीत होते. त्याबाबतची चाचणी आज घेण्यात आली. एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार असून, एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्दी मोजणे, व्यवस्थापन करणे सोपे होणार असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी सांगितले.

## नियमित पाणीपुरवठा करण्याच्या मागणीसाठी महिलांचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** विविध वसाहतींमधून महिला महापालिका पाणीपुरवठा विभागाचे कार्यालय गाठत आहेत. प्रामुख्याने सिडकोच्या वसाहतींमध्ये पाणीटंचाईचे चित्र अधिक बिकट बनल्याचे दिसत आहे. मागील चार दिवसांपासून या भागात सतत आंदोलन सुरू आहेत. सिडको अयोध्या नगर भागात दहा दिवसा आड तेही कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे संतापलेल्या महिलांनी एन-७ येथील जलकुंभ गाठले. महिलांनी या जलकुंभावरील कनिष्ठ अभियंता यांना घेराव घातला. अयोध्या नगरचा पाणीपुरवठा जोपर्यंत सुरळीत होत नाही, तोपर्यंत कुठल्याही वसाहतींना पाणीपुरवठा करायचा नाही, असे म्हणत या महिलांनी पाणीपुरवठ्याचे साहित्यच जप्त केले. अखेर रवींद्र तांगडे यांनी मध्यस्थी केली. तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर महिलांनी आंदोलन मागे घेतले आहे.

### ट्रम्प यांच्यामुळे पाकिस्तानी शेअर बाजाराचं कंबरडं मोडलं; व्यवहार तासभर बंद ठेवूनही ८,६०० अंकांनी कोसळला

कराची : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील अनेक देशांवर परस्पर आयात शुल्क लागू केल्यानंतर अनेक देशांमधील शेअर बाजार कोसळले आहेत. ७ एप्रिल रोजी भारतीय शेअर बाजार सव्वातीन हजार अंकांनी कोसळला. त्यामुळे गुंतवणूकदारांना तब्बल १४ लाख कोटी रुपयांचा फटका बसला आहे. मात्र, पाकिस्तानमधील गुंतवणूकदारांचं याहून अधिक नुकसान झालं आहे. पाकिस्तान स्टॉक एक्सचेंजमधील (पीएसएक्स) बेंचमार्क केएसई-१०० निर्देशांकात सोमवारी ८,६०० अंकांची घसरण झाली आहे. ही घसरगुंडी थांबवण्यासाठी एक तासासाठी व्यवहार थांबवण्यात आले होते.

## विधानसभेच्या निवडणूकीत निवडून आलेल्यांना बॅलेट पेपरवरील निवडणूकीत अर्धी सुद्धा मत मिळत नाहीत - रोहिणी खडसे

दैनिक आपला विदर्भ



**जळगाव/प्रतिनिधी :** काळ जी सातारा येथे सहकारी साखर कारखाना ची निवडणूक पार पडली त्यामध्ये माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या पॅनल भरघोस मताधिक्याने निवडून आले, यावरून असं लक्षात आलं की बॅलेट पेपरवर निवडणुका होत आहेत तर लोकांचा कौल हा आमच्या बाजूने दिसतोय, चार महिन्यांपूर्वी ज्या विधानसभेची निवडणूक झाली आणि मशीनमध्ये मतदान झालं ज्या आमदारांना ५०००० च्या मताने निवडून आलेत आता तेच आमदार अर्धी सुद्धा मतं बॅलेट पेपर वरती घेऊ शकले नाहीत, विरोधकांनी अमाप पैशाचा वाटपही केलं तरी देखील अर्धीही मत घेऊ शकले नाहीत, ई एम व्ही मशीन वरती शंकाच आहे, विधानसभेच्या निवडणुकीच्या बाबतीत जे घडलं त्याची चौकशी झालीच पाहिजे अशी मागणी शरद पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी केली आहे .

## देवगिरी किल्ला आगीच्या विळख्यात!

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर मधील देवगिरी किल्ला आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची बातमी समोर आली आहे. भर उन्हाच्या कडाक्यात देवगिरी किल्ल्याला सकाळच्या सुमारास भीषण आग लागली आहे. या आगीत ऐतिहासिक वास्तूचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीला आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर मधील इतिहासामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा साक्षीदार असलेल्या दौलताबाद अर्थात देवगिरी किल्ल्याला चारही बाजुंनी आगीने घेरले आहे. आज सकाळी ८च्या दरम्यान ही आग लागली असल्याची माहिती मिळाली आहे. उन्हाळ्याच्या झळांमुळे ही आग भडकली असल्याची प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. देवगिरी किल्ल्याच्या चारही बाजूंना आगीचे लोट पसरलेले आहे.

## प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट निर्माते डॉ. मोहन बाबू साईचरणी लीन

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेते आणि चित्रपट निर्माते डॉ. मोहन बाबू यांनी शिर्डीत येऊन श्री साईबाबांचे दर्शन घेतले. त्यांचा श्रद्धा आणि भक्तीवर दृढ विश्वास असून, प्रत्येक चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी ते श्री साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी शिर्डीला भेट





देत असतात.

या वेळी त्यांनी त्यांच्या आगामी ''कनप्पा'' या चित्रपटाच्या यशासाठी श्री साईंच्या चरणी प्रार्थना केली.

# डायल ११२ ला कॉल करून खोटी माहिती दिल्यास १ वर्ष शिक्षा व १० हजारांचा दंड

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापुरातील गणेश टेक्सटाईल्स, एमआयडीसी येथून डॉयल ११२ ला कॉल करून भावानं मर्डर केल्याची खोटी माहिती दिली पोलिसांनी शहानिशा केल्यावर अशाप्रकारची कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन खोटी माहिती दिल्याप्रकरणी कॉल करणाऱ्या विनायक विलास गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस अंमलदार सोमनाथ वाघमारे हे २७ मार्च रोजी पीसीआर मोबाइल १ मध्ये कर्तव्यावर होते. त्यांना मध्यरात्री रोजी १.४८ वाजता डायल ११२ वरून कॉल आला की, गणेश टेक्सटाईल्स, एमआयडीसी, सोलापूर येथे फोन करणारा व्यक्ती घटनास्थळी असून, त्याच्या भावाने मर्डर केला आहे त्यावर ते गणेश टेक्सटाईल्स, एमआयडीसी, सोलापूर येथे गेले. तेथे कॉल करणारा विनायक विलास गायकवाड (रा. १२९, निवारानगर, सिद्ध हनुमान मंदिराजवळ, सोलापूर) हा मिळून आला.

त्यावेळी त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने मीच डायल ११२ ला कॉल केला होता, असे सांगितले. त्यानुसार त्याच्याकडे घटनेबाबत विचारणा केली. त्याच्या नातेवाइकांकडे चौकशी केली. मात्र, अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून संबंधित व्यक्तीने डायल ११२ वर कॉल करून खोटी माहिती दिल्याने त्याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २१७ प्रमाणे गुन्हा नोंदला आहे.

### खोटी माहिती दिल्यास एक वर्षाची शिक्षा व दहा हजाराचा दंड

कोणीही डायल ११२ अथवा इतर कोणत्याही माध्यमातून खोटे कॉल करू नयेत, अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊन संबंधितास १ वर्षाचा कारावास किंवा दहा हजार रुपये दंड, अशी शिक्षा होऊ शकते. कोणीही अशा प्रकारचे कृत्य करु नये, असे आवाहन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी केले आहे.

# पालकमंत्र्यांनी घेतला पाणीटंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा आढावा




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी : जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांनी जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा मंगळवारी आढावा घेतला.**

## 'त्या' १४ गावांना खडकपूर्णाचे पाणी मिळणार पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात झालेल्या या प्रशासकीय विभागांच्या आढावा बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांचेसह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी या बैठकीत जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान, सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा, पाणी टंचाई निवारनार्थ कृती आराखडा, जनावरांसाठी चारापाणी, विहीर अधिग्रहण, जलसंधारणाचे काम, सिमेंट बंधारे बांधकाम, भूजल पाणी पातळी, राष्ट्रीय पेयजल योजना, टँकरने पाणी पुरवठा, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, नळ जोडणी, हर घर जल, जलजीवन मिशन, खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी धोत्रा नंदई व इतर १४ गावांना पाणी उपलब्ध करणे यासह विविध विषयांचा आढावा घेतला.

जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठ्याचे नियोजन करावे, पिण्याचे पाणी नियोजनावर विशेष लक्ष द्यावे, दरवर्षी टंचाई असलेल्या गावांना जलसंधारणाच्या कामांमध्ये प्राधान्य द्यावे, टँकर सुरुअसलेल्या गावांमध्ये बोअरवेलचे काम काम पूर्ण करावे. पाणी पुरवठा योजना ताबडतोब पूर्ण कराव्यात. जलजीवन मिशनच्या कामांचा दर्जा राखला जाईल याची दक्षता घ्यावी. या कामांची नियमित तपासणी करावी. जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करुन द्यावा, पाणीपुरवठा विभागाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करावी, असे निर्देश पालकमंत्री ना.पाटील यांनी प्रशासनाला दिले.

कै. कैलास नागरे यांच्या आत्महत्येला बलिदानाचा दर्जा देण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा असून या मागणीविषयी त्यांना माहिती देणार आहे. कै. नागरे यांच्या वारसांचे पालकत्व शासनाने स्विकारले आहे. तसेच त्यांच्या पत्नीला नौकरी देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्र्यांनी हा पाणी प्रश्न सोडवल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी, गावकरी यांच्याकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

यावेळी कार्यकारी अभियंता राहुल जाधव यांनी पाणी टंचाई निवारनार्थ उपाययोजनाची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.



### 'त्या' १४ गावांना पाणी मिळणार

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कारप्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी २४ मार्च रोजी आत्महत्या केली होती. या घटनेची राज्य शासनाने गंभीर दखल घेत त्यानुषंगाने पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. या बैठकीत खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी धोत्रा नंदई व इतर १४ गावांना बंदिस्त पाईपलाईनद्वारे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. यात अंढेरा, वाकी बु, वाकी खु, सेवानगर, पिंप्री आंधळे, शिवनी अरमाळ, नागणगाव, पाडळी शिंदे, मेंडगाव, बायगाव, सावखेड नागरे, वाघाळा आणि खैरव या गावांना खडकपूर्णाचे १६६० हे सिंचन क्षेत्रासाठीचे पाणी देण्याचा ७० कोटींचा प्रस्ताव नियामक मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्याशी चर्चा केली आहे. लवकरच या प्रस्तावाला मान्यता मिळवून १४ गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी सांगितले.

## धुळे बसस्थानकात कृषी अधिकाऱ्यास लुटमार प्रकरणी रिक्षा चालक एलसीबीच्या ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे बस स्थानकावर पहाटेच्या वेळी बस प्रवासासाठी आलेल्या मंडळ कृषी अधिकाऱ्याला मारहाण करून लुटमार करणाऱ्याच्या मुसक्या आवळून २१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात धुळे एलसीबीला यश आले. याप्रकरणी हरीष उर्फ विजय पवार रा. नकाणे रोड, देवपूर या रिक्षा चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.



२ एप्रिल रोजी शिरपूर मंडळ कृषी अधिकारी शुभम संतराम शिरसाठ यांना तीन अनोळखी इसमांनी जबरदस्ती करीत मारहाण करून खिशातील मोबाईल, पाकीट व त्यातील ३ हजार रुपये रोख रक्कम तसेच महत्वाची कागदपत्रे एटीएम कार्ड हिसकावून लुटमार केली होती. याप्रकरणी धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याचा तपास धुळे एलसीबीचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात येत असतांना गोपनिय माहितीच्या आधारे सुरत बायपास वरील कॅन्सर हॉस्पिटल जवळून हरीष उर्फ विजय पवार या रिक्षा चालकाला ताब्यात घेतले.

विजय पवार याला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने दोन अनोळखी इसमांसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी १८ हजाराचा मोबाईल, ३ हजार रोख रक्कम, आधारकार्ड, एटीएम कार्ड, लायसन्स असा एकुण २१ हजार रुपयांचा मुद्देमाल केला असून त्यांना गजाआड करण्यात धुळे पोलिसांना यश आले आहे.

## मध्यप्रदेश मधून नववधूचे पाच तोळे दागिने आणि आहेराची रोकड पोलिसांनी केली हस्तगत

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** सुमारे दीड महिन्यांपुर्वी धुळे तालुक्यातील शिरूड येथून कैलास पाटील यांच्या मुलाच्या लग्नाच्या दिवशी रायबा लॉन्समध्ये झालेल्या धाडसी चोरीचा छडा धुळे तालुका पोलिसांनी अचूक लावला आहे. डीवायएसपी सागर देशमुख यांच्या अचूक मार्गदर्शनामुळे मध्यप्रदेशात जावून धुळे तालुका पोलिसांच्या पथकाने एका घरातुन नववधूचे चोरीला गेलेले पाच तोळे सोन्याचे दागिने आणि लग्नामध्ये आलेल्या आहेराची रोकड हस्तगत केली आहे. धुळ्याचे पोलिस पथक आल्याची कुणकुण लागताच चोरटे मुद्देमाल सोडून पसार होण्यात यशस्वी झाले आहे.




शिरूड येथून लग्न समारंभ आटोपल्यानंतर संध्याकाळी स्कॉर्पीओ गाडीने घरी जाण्याची लगबग कैलास पाटील कुटूबियांची सुरु होती. नववधूचे पाच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आणि आहेरामध्ये आलेली रोकड बॅगेत भरून ती बॅग स्कॉर्पीओ गाडीत ड्रायव्हरच्या मागील शिटवर त्यांनी ठेवली. काही कामासाठी कैलास पाटील हे कामाच्या गडबडीत गाडीचा दरवाजा उघडा ठेवून पत्नीकडे गेले असता चोरट्यांनी संधी साधून ती बॅग लंपास केली.

चोरट्यांनी बॅग लंपास केल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद होताच पोलिसांनी आपली तपासाची चक्रे फिरवली मात्र, चोरटे हे परराज्यात जाऊन लपून बसले होते. तालुका पोलिसांना सीसीटीव्हीच्या आधारे सदर चोरटे हे मध्यप्रदेश येथील राजगड या ठिकाणी लपून बसले असल्याची माहिती मिळताच त्या ठिकाणी पोलिसांनी धार टाकत सदर मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला असून आरोपी मात्र यामध्ये प्रसार होण्यात यशस्वी झाले आहे. सदर आरोपींचा पोलिसांच्या वतीने कसून शोध घेतला जात आहे व लवकरच त्यांना देखील गजाआड करू असा विश्वास पोलिसांनी एवढी व्यक्त केला आहे.

## उपजिल्हा सामान्य रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**काही दिवसांपासून बुलढाणा जिल्ह्याच्या खामगावात उन्हाचा तडाखा चांगलाच वाढला असून, दुपारच्या सुमारास घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. त्यामुळे रखरखत्या उन्हात उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा आरोग्य प्रशासन सतर्क असून, जिल्हा सामान्य रुणालयात उष्माघाताच्या रुणांसाठी एका वॉर्डात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

शहरासोबतच तसेच ग्रामीण भागात उन्हाचा तडाखा वाढल्याचे दिसून आले. फेब्रुवारी अखेरपासूनच उन्हाचे चटके बसायला सुरुवात झाल्याने एप्रिल आणि मे महिन्यांत उन्हाचा तडाखा अधिक वाढण्याची शक्यता आहे. माणसाच्या शरीरामध्ये नॉर्मल तापमान हे ३७ अंश सेल्सिअस असते आणि शरीर थंड होण्याची प्रक्रिया सुरु होते. शरीरातील पाणी संपले तर घाम येणे बंद होऊन तोंडाला



कोरड पडून उष्माघाताची शक्यता अधिक असते. त्यामुळे उन्हामध्ये बाहेर पडताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने खामगाव येथील उपजिल्हा सामान्य रुणालयात उष्माघाताच्या महिला आणि पुरुष रुणांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

खामगाव येथील सामान्य रुग्णालयात उष्माघात कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. उष्माघात होऊ नये यासाठी वाढत्या उन्हामध्ये कष्टाची कामे करणे टाळावी, उष्णता शोषून घेणारे कपडे घालावेत, उन्हामध्ये शेतावर अथवा इतर मजुरीची कामे फार वेळ करू नये, भरपूर प्रमाणात पाणी प्यावे, घराबाहेर पडताना छत्री, टोपी किंवा चेहऱ्यावर कपडा बांधावा, अशक्तपणा असेल तर त्वरित डॉक्टरांना दाखववावे स्वतः ची उन्हापासून सांभाळावे असे आवाहन वैद्यकिय अधिक्षक डॉ. निलेश टापरे यांनी केले आहे.

## शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**केंद्र व राज्य शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा. गरजूवंत लाभार्थी योजनाचा लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता संबधितानी घ्यावी, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

सामाजिक न्याय विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व शासनाच्या योजनांचे आढावा बैठक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी केंद्रीय




राज्यमंत्री श्री. आठवले बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी, समाजकल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, जिल्हा परिषदचे समाज कल्याण अधिकारी डॉ. अनिता राठोड, अग्रणी जिल्हा प्रबंधक के.के. सिंह, प्रकल्प अधिकारी राजेश इंगळे, अन्न धान्य पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे, तहसिलदार विजय सवळे, यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, केंद्र सरकारच्यावतीने अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय, जेष्ठ नागरीक, दिव्यांग यांच्या सबलीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेचा लाभ प्रत्येक गरजू लाभार्थ्याला मिळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन या योजनेबाबत समाजात माहिती उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना या योजनेचा लाभ मिळू शकेल. अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात चांगल्या सुविधा उपलब्ध करुन वसतीगृहाची क्षमता वाढविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याचे सूचना श्री. आठवले यांनी दिले.

या बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, अनुसूचित जाती उपयोजना, शिष्यवृत्ती योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन योजना, वृद्धाश्रम योजना, संजय गांधी निराधार योजनांचा यावेळी आढावा घेतला.

## विविध वृत्त...

### गावात स्वतंत्र स्मशानभूमी बांधून देण्याच्या मागणीसाठी पीपल्स रिपब्लिकन पक्षाची निदर्शने





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील भडगाव येथे बौद्ध समाज बांधवांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी बांधून देण्यात यावी यासाठी शासनाकडे वारंवार मागणी करण्यात आली. आंदोलन उपोषणही करण्यात आले. मात्र, अजूनही स्मशानभूमी बांधून देण्यात येत नसल्याने अनेक प्रेताची विटंबना होत आहे. या संदर्भात पालकमंत्री मकरंद जाधव यांना आपल्या मागणीचे निवेदन देण्यासाठी आलेल्या गावातील महिला व पुरुषांना पालकमंत्री मकरंद जाधव यांची बैठक सुरू असल्यामुळे बराच वेळ ताटकळत बसावं लागलं आणि त्यामुळे संतप्त झालेल्या या संपूर्ण ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच जोरदार घोषणाबाजी करत जिल्हा प्रशासनाचा निषेध केला.

### गॅस सिलिंडरचा स्फोट, अख्खं घर जळलं ८ वर्षाच्या चिमुकल्याचा होरपळून मृत्यू, आजी जखमी

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :**गॅस सिलिंडरचा स्फोटा होऊन घराला आग लागली आहे. या दुर्घटनेत ८ वर्षाच्या नातवाचा जागीच आगीच होरपळून मृत्यू झाला. तर आजी ९० टक्के भाजली आहे. आजीची मृत्यूशी झुंज सुरू आहे. आगीची माहिती मिळताच स्थानिक आणि आपत्कालीन विभाग घटनास्थळी दाखल झाले. आजीला स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. ही धक्कादायक घटना वाशिम च्या मालेगाव तालुक्यातील राजुरा गावात रात्रीच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे राजुरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राजुरा येथील सुनीता बोंढारे (वय ४५ वर्षे ) ही महिला आपल्या ८ वर्षीय नातू चरण बोंढारेसह रात्री घरात असतांना घरात असलेल्या सिलेंडरच्या आगीचा मोठा भडका उडाला. या आगीच्या विळख्यात आजी आणि नातू सापडून भाजल्यानं दोघेही गंभीर जखमी झाले. इतर चार सदस्य घरा बाहेर असल्याने ते या आगीतून वाचले. आगीनंतर घरात आरडाओरड सुरू झाल्याने शेजारच्यांनी घटनास्थळी धाव घेत दोघांच्याही अंगावर पाणी टाकून विझविले.

त्यानंतर दोघांनाही उपचारासाठी वाशिम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले मात्र गंभीर भाजलेल्या आठ वर्षीय मुलगा चरण बोंढारेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर आजी सुनीता बोंढारेची प्रकृती चिंता जनक असल्यानं तिला पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात आलं आहे. घटना स्थळी मालेगावचे ठाणेदार संजय चौधरी यांनी त्यांची चमू तसेच अग्निशमन दल दाखल झाल्यावर आग नियंत्रणात आणली.या आगीमध्ये घरगुती साहित्यसह अन्नधान्य जळून खाक झाल्यानं मोठं आर्थिक नुकसान ही झालं आहे. या आगीच्या घटनेचा तपास मालेगाव पोलीस करत आहेत. मागच्या काही महिन्यांमध्ये सिलिंडरची गळती किंवा स्फोट होऊन आग लागण्याचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे.

### हिंगोली जिल्ह्यातील १४ हजार महिलांना कॅन्सर? २० दिवसांमध्ये...

**हिंगोली/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात महिलांच्या आरोग्य तपासणीदरम्यान संपूर्ण आरोग्य यंत्रणेला खडबडून जागा करणारा अहवाल समोर आला आहे. हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेल्या संजीवनी अभियानाचा हादरवून टाकणारा अहवाल समोर आला असून या अहवालानुसार तब्बल १३ हजार ९५६ महिला कर्करोग संशयित असल्याचे दिसून आले आहे. या महिलंची आरोग्य विभागाकडून तालुकास्तरावर स्क्रिनींग केली जाणार असून त्यासाठी आरोग्य विभागाने नियोजन केले आहे.

संजीवनी अभियानासाठी आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन या अभियानात नेमके काय करायचे याची माहिती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली होती. त्यानंतर आशा कर्मचाऱ्यांमार्फत गावपातळीवर महिलांची माहिती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. जागतिक महिला दिनापासून म्हणजेच ८ मार्चपासून गाव पातळीवर महिलांच्या भेटी घेऊन त्यांची आरोग्य विषयक माहिती घेण्यात आली आहे.